# Current Global Reviewer

**Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal**

**PEER REVIEWED & INDEXED JOURNAL**

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

05 Sept. 2021 Special Issue- 43 Vol. I



# Literature, Culture and Media


**Chief Editor**

**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**

**Principal Dr. Kishan Pawar**

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-8648

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

05 Sept. 2021 Special Issue - 43 Vol. I

# Literature, Culture and Media

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Principal Dr. Kishan Pawar

Shaurya Publication, Latur

CURRENT GLOBAL REVIEWER

| Special Issue 43, Vol. 1<br>Sept. 2021 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|


27. मराठी भाषा आणि साहित्य:अध्ययन-अध्यापनात माध्यमांची भूमिका 81

डॉ. रेखा कचरूजी मेश्राम

28. वाचनसंस्कृती आणि माध्यमे : एक दृष्टिक्षेप 84

प्रा.डॉ.दादाराव गुंडरे

29. वाचन संस्कृती वर माध्यमांचा होणारा प्रभाव 87

जितेंद्र यादव गवई

30. वाचन संस्कृतीवर माध्यमांचा होणारा प्रभाव 90

पंढरीनाथ हरी मोकळे

31. अंधश्रद्धा आणि वर्तमानपत्रांची भूमिका 93

प्रा. नारायण वा. पाटील

32. अध्ययन अध्यापना माध्यमाची भूमिका 97

प्रा.डॉ.प्रधान रामकृष्ण ज्योतिबा

33. वाचन संस्कृतीवर होणारा माध्यमांचा प्रभाव 99

प्रा. बालासाहेब विष्णू कटारे

34. संवाद माध्यमात माध्यमाचे महत्त्व 102

डॉ.रविंद्र आसाराम गायके

35. अध्ययन-अध्यापनात माध्यमांची भूमिका 104

प्रा.डॉ.गणपती जोतीबा मोरे

36. साहित्य, समाज आणि माध्यमे 106

प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे

37. साहित्य, संस्कृती आणि जीवन 108

डॉ.चत्रभुज नारायणराव सोळंके

38. साहित्य आणि संस्कृती सहसंबंध एक अभ्यास 110

डॉ. भालचंद्र गोविंदराव कुलकर्णी

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 43, Vol. 1
Sept. 2021
Peer Reviewed
SJIF
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# साहित्य, समाज आणि माध्यमे

प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर,गढी.

---

प्रस्तावना

साहित्याचा, भाषेचा प्रसारमाध्यमांशी अन्योन्य संबंध असतो. माध्यमांनी नेहमीच साहित्याला प्राधान्य दिले आहे. माध्यमांच्या एका बाजूला परिस्थितीचे संदर्भ असतात, तर दुसऱ्या बाजूने विचारशील, कृतीशीलतेची भूमिका असते. समाज, शासन, प्रशासन, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, इत्यादी बरोबरच स्थानिक मुद्दे मांडण्याची जबाबदारी ते घेतात, तद्वतच माणसाच्या विचाराअभिव्यक्तीला प्रग्लभ करण्यातही माध्यमे महत्वाची भूमिका घेतांना दिसतात. एकप्रकारे माध्यमे ही मानवी समुहाची सामाजिक, सांस्कृतिक गरज भागवतात. वृत्तपत्रे (नियतकालिके - अनियतकालिके) दुरदर्शन, रेडिओ, नाटके, चित्रपट अशा माध्यमातून स्वातंत्र्याची जाणीव सर्वदुर झाली, तर माहिती आणि ज्ञानाचे सार्वत्रिकीकरण करण्यातही माध्यमांचा वाटा सर्वाधिक म्हणावा लागेल. डॉ. वीरा राठोड हे "आजच्या काळाचा उल्लेख 'समाजमाध्यमोत्तर समाज' असा करायला हरकत नाही, एवढा प्रचंड हस्तक्षेप आणि विलक्षण पगडा मानवी जीवनात समाजमाध्यमांनी निर्माण केलेला आहे, जो खऱ्या अर्थानं उपकारकच म्हणता येईल. ही वर्तमान जगातील संपर्काची, संवादाची, अभिव्यक्तीची अतिशय प्रभावी माध्यमं ठरली आहेत." असे म्हणतात.

आजतर अनेक प्रकारचे नवनवीन माध्यमे हाताशी येत आहेत. मोबाईल, कम्पुटर, लॅपटॉप, इ. आणि इंटरनेटच्या वापराने आलेली वेगवेगळ्या माध्यमांची बहुपर्यायी उपलब्धता यामुळे सर्वसामान्यांचा वावर जागतिक झाला आहे. तसाच प्रसार माध्यमे आणि साहित्य यांचा गुंता जुना असून एकमेकांना पूरक असूनही या दोन्ही क्षेत्रांत आज संघर्ष बघावयास मिळतो. स्पर्धा व समाजाच्या मागणीमुळे दोन्ही क्षेत्रांत बदल होत असून दोन्हीही माध्यम समाजहितासाठी प्रभावी ठरतात. साहित्य आणि समाज साहित्य हा समाजाचा आरसा असतो असे म्हणतात, आणि आरसा सोयीनुरूप प्रतिबिंब दाखवत नाही. म्हणजे जे जस आहे, तसच त्याला दाखवतो तो आरसा. पण याच्याही पुढे जाऊन होत जाणारे बदल, आलेली वेगवेगळी वळणे, घडून गेलेली स्थित्यांतरे आणि पुढची दिशाही अधोरेखीत करत असते ते साहित्य. आरसा फक्त आणि फक्त आत्ता काय आणि कसे हे दाखवून वर्तमानी भूमिका ठामपणे घेत असतो, तर भुत, भविष्य व वर्तमानाचेही रेखांकन साहित्य करत असते. एकप्रकारे कशानेही न साधता येणारे काळाला साठवण्याचे तंत्र, शब्दांच्या सहाय्याने चिमटीत पकडण्याची किमया साहित्य लिलया करत असते. म्हणूनच त्या त्या काळातला लिहिता वर्ग व वाचक वर्ग यावरच त्या समाजाची भिस्त असते. रत्नाकर मतकरी म्हणतात तसं, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, आणि महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर, साहित्याच्या आरशात, समाजाचा बदलता चेहरा अंधुकपणे का होईना, पण दिसत राहिला. एकप्रकारे याच माध्यमातून समाजाची सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि मानसिक पुरोभूमी तयार करण्याचे काम साहित्यातून होत असते. "साहित्य, समाजात परिवर्तन घडवून आणेलच, असं नाही. पण ते परिवर्तनाची दिशा नक्कीच दाखवू शकेल! त्या त्या काळातल्या साहित्यावरून समाजातला बुद्धिनिष्ठ वर्ग कुठल्या विचारधारेला महत्त्व देतो, कुठली कृती योग्य मानतो, हे स्पष्ट कळतं! कुठलंच साहित्य कधी स्वार्थ, अप्रामाणिकपणा, भ्रष्टाचार यांची भलामण करत नाही! ते कायम न्यायाच्या, मानवतेच्या, शुचितेच्या, औचित्याच्या बाजूनंच उभं राहातं! ते कुठल्याही शैलीत असलं, तरी त्याचा आशय माणसाच्या उन्नतीचाच असतो. अगदी समाजाच्या बकालपणाचं चित्रण करणारं साहित्यही अप्रत्यक्षपणे व्यवस्थेमधल्या त्रुटींवरच बोट ठेवतं. समाजाकडे अवनतीचा जाब मागतं! समाजापुढचे प्रश्न नेहमीच बदलत असतात. साहित्यिक त्यांची योग्य उत्तरं सांगण्याचा प्रयत्न करीत असतो. ती समाजाच्या हिताची असली, तरी नेहमीच त्याच्या सोयीची नसतात. त्यामुळे कधी नकळत, तर कधी जाणूनबुजून समाज साहित्यिकाच्या संदेशाकडे दुर्लक्ष करतो! मात्र जेव्हा केव्हा तो मार्गदर्शनासाठी वळून पाहातो, तेव्हा त्याला प्रत्येक वळणावर हातात कंदिल घेऊन जागल्याचं काम करणारा साहित्यिक दिसल्याशिवाय राहात नाही!"१ साहित्य आणि साहित्यिक हे समाजाचा भोवताल अभिव्यक्त करत करत, परिस्थितीचे वास्तव भान समोर आणत असतात. सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक व शासकीय इ. विषयाचा आवाका आणि गांभीर्य प्रथमतः चित्रीत होत जातो तो साहित्य आणि माध्यमातूनसुद्धा.

समाज आणि माध्यमे ही समाजाची दिशा आणि दशा दोन्हीही प्रतिबिंबीत करत असतात. लोकमानस, जनमत आणि मतप्रवाह निर्माण करण्यात माध्यमांची भूमिका ही फार महत्त्वाची असते. म्हणूनच "तकनीकी विकास के प्रत्येक दौर में मीडिया का नाता सत्ता के साथ-

य आम जनमानस से गहरा रहा है।" असे डॉ. अर्पण जैन 'अविचल' मध्ये म्हणतात. तशीच अगदी सुरूवातीच्या काळापासून माध्यमांनी त भूमिका घेतलेली दिसेल. लोक प्रबोधन, मनोरंजनाच्या क्षेत्रात अग्रेसर असणारी अशी ही एक काळाची गरज होती, जी काळानुरूप लत गेली. आज तर माध्यमांनी माहिती आणि ज्ञानस्तोत्राची जागा घेतलेली आहे. लेखन, वाचन या क्षेत्रातही माध्यमे अग्रेसर असल्याचे तते. एकूणच समाजाच्या मत आणि मानसिकतेला प्रगल्भ करण्यात माध्यमांचा जसा वापर करण्यात येतो, तसाच त्यांना नियंत्रित ण्यातही माध्यमे मागे नाहीत. यांचे स्वरूप विविधांगी आहे. जवळपास प्रत्येकाच्या हाताशी आलेला मिडिया आता social media झाला हे. त्याबाबत काही नियमावली आहे मात्र वापरावर निर्बंध असल्याचे दिसत नाही, म्हणूनच अनेक वळणा, वाटाने याचा प्रवास, प्रवाह त नेतो प्रत्येकाला. वृतपत्र, आकाशवाणी, दुरदर्शन, चित्रपट, संगीत, नाटक, इत्यादी बरोबरच आधुनिक असे Email, Whatsapp, acebook, Teligram, Twiter, blog अनेक पर्याय सहज उपलब्ध झाले आहेत. त्या माध्यमातून होणाऱ्या Chat आणि Share ने बहुतेक र्वदा मोडीत काढून माणसा माणसाला, गटा गटाला आपल्याकडे आकर्षित करून, दिसेल तसेच, सांगेल तसेच चालायला व बोलायला खील भाग पाडले आहे. तेव्हा अनेक राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक असे अजेंडे forward च्या नावाखाली घराघरात मनामनात लिलया रत राहतात.

ाध्यमांची भूमिका

"प्रसारमाध्यमे ही समाजाचा आरसा आहेत. ती घडलेल्या प्रत्येक घडामोडीला टिपून तिला घराघरात पोहोचवण्याचा व्यावसायिक यत्न करत असतात. प्रत्येक प्रसार माध्यमाचे उद्दिष्ट हे वेगळे सांगण्याची गरज नाही माध्यमे नकळतपणे आपल्या जीवन व्यवहाराला जोडली लेली आहेत. आपल्यासमोर वर्तमानपत्र येते, आकाशवाणी वरील बातम्या नवी नवी माहिती देतात. आणि दूरदर्शन तर आपल्या बौद्धिक व ांस्कृतिक अभिरुचीचा विभाज्य भाग बनला आहे याशिवाय व्यवसाय, ज्ञान, संवाद आणि मनोरंजन याच अनुषंगाने इंटरनेटच्या माध्यमातून त्येक माणूस आज जगाला जोडला गेला आहे. थोडक्यात काय तर प्रचार व प्रसार माध्यमांनी आपल्याला इतके घट्ट मिठीत घेतले आहे की आपण कितीही प्रयत्न केले तरीही ती सैल करणे शक्य नाही"२

अशीही या प्रसार माध्यमांची व्यवसायीकता सतत माणसाला प्रभावित करत असते. लोकशाहीचा आधारस्तंभ आणि मानवी मुल्यांची पाठराखण ही खरी प्रसार माध्यमे, समाज माध्यमांची भूमिका असते. तशी अपेक्षा हरएकाला माध्यमाकडून असतेच असते. जगभरातली जी अनेक आवर्तने आली आणि परिवर्तने झाली त्यात माध्यमांचाच वाटा सर्वाधिक म्हणायला हरकत नाही. जेव्हा राजकीय , सामाजिक स्थित्यांतरात माध्यमांचा ठामपणा, वैचारिक ठेवा महत्त्वाची भूमिका घेत असतो. तेव्हाच त्या बदलातून सकारात्मक असे काही निर्माण होत असते हा इतिहास सांगत आलाय. तसे प्रत्येक माध्यमांनी स्वतःचा बाज संभाळत सर्वच बाजूंना यथातथा स्थान देण्याचा प्रयत्न केलेला आहेच. बातमी, माहिती, यासह ज्ञान, लेख, स्तंभ, विचार, मते आज काही वेळात अनेकापर्यंत जाऊन पोहचतात. ते केवळ माध्यमामुळेच. भविष्यकाळाला दिग्दर्शीत करायचे आणि जनमताला अनुकूल करत लोकहिताचे मूल्ये सांभाळायचे हा असतो माध्यमांचा मुलाधार. आणि तोच सांभाळण्यासाठी येणाऱ्या काळात माध्यमांना कसरत करावी लागणार आहे. यात मराठी साहित्यिकांनीही माध्यमावर व्यक्त होऊन वैचारिक, सांस्कृतिक पाठबळ द्यायलाच हवे.

संदर्भ ग्रंथ

१) अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनातील रत्नाकर मतकरी यांच्या भाषणातील भाग.
२) जागतिकीकरण - मराठी भाषा. आव्हाने आणि उपाय, संपादक, डॉ. जयद्रथ जाधव, चिन्मय प्रकाशन, पृष्ठ क्र. २०१